# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः25.12.2024** **वारःबुधवार**

---

1. माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त देशभरात आज सुशासन दिनाचं आयोजन.
2. विकसित भारत बनवण्यासाठी घडवण्यासाठी मानसिकतेत मूलभूत बदल करायला हवं-पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
3. देशातल्या पाच राज्यांच्या राज्यपालांची राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याद्वारे नियुक्ती.
4. नाताळ सणाचा देशभरात उत्साह; ठीकठिकाणच्या चर्चमध्ये प्रभू येशूचा जन्मोत्सव साजरा
5. 67 व्या राष्ट्रीय नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत खेळाडूंची चमकदार कामगिरी आणि
6. महिला क्रिकेटमध्ये वेस्ट इंडीजविरुद्धच्या मर्यादित षटकांच्या मालिकेत भारताची 2-0 अशी विजयी आघाडी

**वाजपेयी जयंती**

माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त वाजपेयी यांच्या नवी दिल्लीतील सदैव अटल या समाधीस्थळी त्यांना आज अभिवादन करण्यात येईल. अटलबिहारी वाजपेयी यांची जयंती देशभरात सुशासन दिन म्हणून साजरी केली जाते. यानिमित्त देशभरात अनेक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**मोदी-मध्यप्रदेश**

दरम्यान सुशासन दिना निमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी आज खजुराहोमध्ये अनेक विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी करण्यासाठी मध्य प्रदेशला भेट देणार आहेत. या दौऱ्यात मोदी यांच्या हस्ते केन-बेतवा नदी जोड प्रकल्पाची पायाभरणी होणार आहे. हा देशातला पहिला राष्ट्रीय नदी जोड प्रकल्प आहे. या प्रकल्पामुळे मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशमधील विविध जिल्ह्यांना सिंचनाची सुविधा उपलब्ध होणार असून लाखो शेतकऱ्यांना त्याचा फायदा होणार असून या प्रकल्पामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्याची सुविधाही उपलब्ध होणार आहे.

**जितेंद्र सिंग**

प्रशासनाच्या कामकाजात सुटसुटीतपणा आणण्यासाठी तसंच ते जास्तीत जास्त लोकाभिमुख करण्यासाठी कालबाह्य झालेले सुमारे दोन हजार नियम काढून टाकण्यात आल्याची माहिती कार्मिक, नागरिक तक्रार आणि निवृत्तीवेतन राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंग यांनी दिली आहे. सुशासन दिनाच्या पूर्वसंध्येला आयोजित एका कार्यक्रमात ते काल नवी दिल्लीत बोलत होते.

**पंडित मदन मोहन मालवीय**

पंडित मदनमोहन मालवीय यांची 163 वी जयंती आज देशभरात सर्वत्र साजरी करण्यात येत आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात उल्लेखनीय योगदानासोबतच प्राचीन भारतीय संस्कृतीचे अभ्यासक म्हणून त्यांची ख्याती होती. समाजकार्य, पत्रकारिता, वकिली अशा क्षेत्रातही ते कार्यरत होते. भारतरत्न या सर्वोच्च नागरी सन्मानानं त्यांना गौरवण्यात आलं होतं.

**पंतप्रधान**

2047 पर्यंत विकसित भारत घडविण्याच्या दिशेनं लक्ष केंद्रित करण्यासाठी मानसिकतेत मूलभूत बदल करायला हवा असं मत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केलं आहे. ते काल नवी दिल्लीत आर्थिक क्षेत्रातल्या तज्ज्ञांसोबतच्या बैठकीत बोलत

होते. 'जागतिक अनिश्चिततेच्या काळात भारताच्या विकासाची गती कायम राखणं' या मध्यवर्ती संकल्पनेवर ही बैठक आयोजित करण्यात आली होती. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन, निती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी व्ही आर सुभ्रमण्यम आणि इतर वरिष्ठ अधिकारी बैठकीला उपस्थित होते.

**राज्यपाल नियुक्ती**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल पाच राज्यांच्या राज्यपालांची नियुक्ती केली. मिझोरामचे राज्यपाल डॉ. हरी भाऊ कभांम्पती आता ओडिशाचे राज्यपाल असतील. ओडिशाचे राज्यपाल रघुवर दास यांनी राजीनामा दिल्यामुळे कभांम्पती यांना राज्यपाल पदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. माजी केंद्रिय मंत्री जनरल विजय कुमार सिंग यांची मिझोरामचे राज्यपाल म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. बिहारचे राज्यपाल राजेंद्र अर्लेकर यापुढे केरळचे राज्यपाल म्हणून काम पाहतील आणि केरळचे सध्याचे राज्यपाल अरिफ मोहम्मद खान यांच्याकडे बिहारच्या राज्यपाल पदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. तसंच माजी गृह सचिव अजय कुमार भल्ला यांची मणिपूरचे राज्यपाल म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

**नाताळ**

भगवान येशू ख्रिस्ताचा जन्मदिवस म्हणजेच नाताळच्या सणाचा आज सर्वत्र उत्साह आहे. काल रात्री 12 वाजता सर्व ठिकाणच्या चर्चमध्ये प्रभू येशूचा जन्मोत्सव साजरा करण्यात आला. ख्रिश्चन धर्मीय नागरिकांनी एकमेकांना ख्रिसमसच्या आणि येणाऱ्या नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. नाताळनिमित्त ठिकठिकाणच्या चर्चमध्ये आकर्षक सजावट करण्यात आली असून येशू जन्माचे देखावे साकारण्यात आले आहेत. कॅरोल गायनासह अनेक कार्यक्रमांमध्ये ख्रिस्ती बांधव मोठ्या उत्साहाने सहभागी होत आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी ख्रिस्ती बांधवांना ख्रिसमसच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

**अमित शहा**

दहा हजारांपेक्षा जास्त बहुउद्देशीय कृषी प्राथमिक सहकारी संस्थांचं तसंच दुग्धव्यवसाय आणि मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांचं लोकार्पण आज केंद्रिय सहकार मंत्री अमित शहा यांच्या हस्ते होणार आहे. सहकारी संस्थांच्या राष्ट्रीय परिषदेत या नव्या संस्थांना नोंदणी प्रमाणपत्र, रुपे किसान क्रेडिट कार्डस आणि मायक्रो एटीएम देखील शहा यांच्या हस्ते आज वितरित करण्यात येईल. यामुळं ग्रामीण भागातल्या नागरिकांना विविध योजनांचा लाभ घेणं सोपं होईल.

**अमित शहा**

तीन नवीन फौजदारी कायदे नागरी हक्कांचे रक्षक आणि न्याय सुलभतेचा आधार बनत असून या कायद्यांची अंमलबजावणी प्रक्रिया सुलभ करण्याच्या सूचना गृहमंत्री अमित शहा यांनी दिल्या आहेत. ते काल नवी दिल्लीत राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरो सोबत आढावा बैठकीत बोलत होते. देशातील प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशात ई साक्ष (eSakshya,) न्याय श्रुती (Nyaya Shruti,) ई साईन eSign आणि ई- समन्स (eSummons) सारख्या ऍप्लिकेशन्सच्या वापरावर गृहमंत्र्यांनी भर दिला.

**ग्राहकदिन**

राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त काल देशभरात अनेक उपक्रम घेण्यात आले. प्रामुख्यानं ऑनलाईन माध्यमातून होणारी फसवणूक टाळून ग्राहकांना सक्षम करण्याच्या उद्देशानं विविध मंचाचं उद्घाटन केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांनी काल केलं. यात जागो ग्राहक जागो ऍप, जागृती ऍप, आणि जागृती डॅशबोर्डचा समावेश आहे.

**इस्रो-स्पॅडेक्स**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था  अर्थात इस्रोच्या स्पॅडेक्स मिशनची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. या मिशन अंतर्गत एकाचवेळी दोन उपग्रहांचं एकत्रित प्रक्षेपण  करण्यात येणार  आहे. येत्या 30 डिसेंबरला सोमवारी श्रीहरिकोटा इथून हे प्रक्षेपण होणार आहे. एकत्रित प्रक्षेपपणानंतर दोन्ही उपग्रह विभक्त झाल्यानंतर  दोन वर्षांपर्यंत कार्यरत राहतील. अशाप्रकारचं मिशन राबवणारा भारत जगातला चौथा देश ठरेल.

**पशु निवारागृह**

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणानं रस्ता सुरक्षा उपाययोजनांसाठी राष्ट्रीय महामार्गांलगत पशु निवारा गृह सुविधा सुरू करण्याचा पथदर्शी प्रकल्प हाती घेतला आहे. प्राण्यांमुळे होणारे रस्ते अपघात टाळण्यासाठी आणि राष्ट्रीय महामार्गावर आढळणारी भटकी गुरं आणि जनावरांची काळजी घेण्याच्या दृष्टिनं हा निर्णय घेतल्याचं रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयानं म्हटलं आहे. अशा प्रकारचा पहिला प्रकल्प उत्तर प्रदेश आणि हरियाणा राज्यातल्या राष्ट्रीय महामार्गालगत उभारण्यात येणार आहे.

**काँग्रेसयादी**

आगामी दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसनं आपल्या उमेदवारांची दुसरी यादी काल जाहीर केली. सतीश लुथ्रा, धरमपाल चंडेला, फरहाद सुरी, राजेश लिलोठिया आणि विनीत यादव यांचा या उमेदवारांमध्ये समावेश आहे.

**नेमबाजी**

67 व्या राष्ट्रीय नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत पंजाबच्या गनेमत सेखन हिनं महिलांच्या स्किट प्रकारात सुवर्णपदक मिळवलं. गनेमतचं या स्पर्धेतलं हे सलग दुसरं सुवर्णपदक आहे. स्किट प्रकारात पंजाबच्याच असीस छिना हिला रौप्यपदक मिळालं तर रायझा ढिल्लों हिला कांस्य पदक मिळालं. पुरुषांच्या स्किट प्रकारात भवतेग सिंग गिल यानं 60 पैकी 54 लक्ष्यांचा अचूक भेद करत सुवर्णपदक पटकावलं. फतेहसिंग शेरगिल याला रौप्य तर मिराज अहमद खान याला कांस्य पदक मिळालं. स्किट प्रकारात पुरुषांच्या कनिष्ठ गटात हरियाणाच्या इशान सिंग लिब्रा यानं सुवर्णपदक पटकावलं. अंतिम फेरीत भवतेग सिंग आणि इशान दोघांनाही 52 गुण मिळाले त्यानंतर झालेल्या निर्णायक शूट ऑफमध्ये 6-5 अशा गुणांनी इशाननं विजेतेपद मिळवलं. स्किट प्रकारात महिलांच्या कनिष्ठ गटात रायझा ढिल्लों हिनं सुवर्णपदक मिळवलं. वनिष्का तिवारीला रौप्य तर यशस्वी राठोडला कांस्यपदक मिळालं.

**महिला क्रिकेट**

महिला क्रिकेटमध्ये वेस्टइंडीजविरुद्धचा मर्यादित षटकांचा दुसरा सामना काल भारतानं 115 धावांनी जिंकला. या विजयाबरोबरच तीन सामन्यांच्या या मालिकेत भारतानं 2-0 अशी विजयी आघाडी घेतली आहे. वडोदरा इथं झालेल्या कालच्या सामन्यात हरलीन देओलच्या धडाकेबाज शतकी खेळाच्या जोरावर भारतानं पाहुण्या संघाला 359 धावांचं मोठं लक्ष्य दिलं. या लक्ष्याचा पाठलाग करताना वेस्ट इंडीजचा संघ 47 व्या षटकापर्यंत केवळ 243 धावाच करू शकला. या मालिकेतला अखेरचा तिसरा सामना येत्या शुक्रवारी होणार आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार